| MHST060000432018 | नियमित दिवाणी दावा क्रमांक ११/२०१८<br>सुशीला शंकर पवार – वादी<br>विरुध्द<br>मोहन कोंडिबा गायकवाड व इतर– प्रतिवादी |
|---|---|

## निशाणी क्रमांक ५१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक ९ यांनी त्यांच्याविरूध्द पारित झालेला दिनांक १९/०६/२०१८ रोजीचा "एकतर्फा" आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करून घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जात कथन केले आहे की, त्यांना दाव्याचे समन्स रूजू झाले होते परंतू ते आजारी असल्याने सातारा येथे दवाखान्यात दाखल होते. त्यांनी पुढे कथन केले आहे की, त्यांना कायदयाचे ज्ञान नसल्याकारणाने ते वेळेत कैफियत दाखल करू शकले नाहीत. सबब त्यांच्याविरूध्द दिनांक १९/०६/२०१८ रोजी "एकतर्फा" आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादींनी जाणुनबूजून विलंब केला नसून प्रतिवादींचे न्यायहक्काकरीता सदरचा "एकतर्फा" आदेश रद्द करून प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करून प्रतिवादी यांनी दिलेली कारणे योग्य व समर्पक नसून विलंब झाल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत अर्जासंदर्भात कायदेशीर व प्रथमदर्शनी पुरावा दिला नसून प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा असे कथन केले आहे.

४. दोन्ही पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला आणि अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. सदरचा दावा वादीने प्रतिवादीविरूध्द वाटपासाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात एकाच वेळी

कायदेशीर गुंतागुत न वाढवता आणि प्रकरणाचा योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी सदर दाव्यात प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रतिवादींनी कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाबाबत खर्च बसवून भरपाई करता येईल. म्हणून, मी खालील आदेश पारित करीत आहे-

**<u>आदेश</u>**

१. सदरचा निशाणी क्रमांक ५१ चा अर्ज रूपये २००/– खर्चाच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे. सदरचा खर्च वादींना देण्यात यावा.

२. प्रतिवादी क्रमांक ९ यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करून त्याची एक प्रत वादी यांना देण्यात यावी.

सही/–

दिनांक – ०४/०८/२०२६ (श्रीमती ए. वाय. शेख)
ठिकाण – दहिवडी सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दहिवडी.